# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ०४/०९/२०२४ (बुधवार) सायंकाळ

---

### अमलतास पर्यटन संकुल, सिल्लारी येथे पोलीस पाटलांसाठी वन संरक्षण कार्यशाळा संपन्न

दिनांक ४ सप्टेंबर रोजी अमलतास पर्यटन संकुल, सिल्लारी येथे पोलीस पाटलांची वन संरक्षण आणि संवर्धनातील भूमिका यावर भर देणारी महत्त्वपूर्ण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमात पोस्टे रामटेक, देवलापार, पारशिवनी, सावनेर भागातील पोलीस पाटलांचा सक्रिय सहभाग होता.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री हर्ष पोद्दार, आणि मा. श्री प्रभुनाथ शुक्ला, पेंच व्याघ्र प्रकल्प, महाराष्ट्र उपसंचालक हे उपस्थित होते. या कार्यक्रमात मा. श्री कोडापे विभागीय वन अधिकारी, दक्षता, नागपूर आणि मा. श्री नितीन देसाई, भारतीय वन्यजीव संरक्षण सोसायटी (WSPI) चे संचालक उपस्थित होते.

पोस्टे पारशिवनी, रामटेक, खापा, केळवद आणि देवलापार पोलीस ठाण्याचे ठाणेदार देखील कार्यशाळेत उपस्थित होते, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हे उपस्थित होते. त्यांनी वनविभाग आणि कायद्याची अंमलबजावणी यांच्यात आवश्यक असलेल्या सहयोगी दृष्टिकोनावर भर दिला. कार्यशाळेदरम्यान, मा. श्री प्रवीण लेले, रेंज फॉरेस्ट ऑफिसर, नागलवाड (UC), आणि मा. श्री जयेश तायडे, रेंज फॉरेस्ट ऑफिसर, पाओनी (UC), यांनी वन विभागाच्या वन संरक्षण आणि संवर्धनाच्या मिशनला पाठिंबा देण्याबाबत मार्गदर्शन केले. गुप्तचर माहिती देणे, मानव–प्राणी संघर्ष परिस्थितीची आगाऊ माहिती देणे आणि तपासात मदत करणे यासारख्या प्रयत्नांमध्ये पोलीस पाटील महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात यावर त्यांनी भर दिला. श्री. तायडे यांनी मानव–प्राणी संघर्षाची परिस्थिती हाताळण्यात पोलीस पाटलांची भूमिका नमूद केली. श्री देसाई यांनी शिकारीबाबत गुप्तचर माहिती देणाऱ्यांना गुप्त निधी सहाय्य करण्यासाठी डब्ल्यूपीएसआय योजनेची माहिती दिली.

मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री हर्ष पोद्दार आणि मा. श्री प्रभुनाथ शुक्ल यांनी पोलीस पाटलांना प्रेरित करण्याची संधी साधून वन संरक्षणातील त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली. पोलीस पाटील वनक्षेत्रात संरक्षणाच्या प्रयत्नात आणि कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी प्रभावीपणे कशी मदत करू शकतात याबद्दलही त्यांनी मौल्यवान माहिती दिली. मा. श्री हर्ष पोद्दार यांनी वन्यजीव संरक्षणात समाजाची भूमिका मांडली. खुल्या विहिरीच्या धोक्यांबाबत जनजागृती करण्यावरही त्यांनी भर दिला. श्री शुक्ला यांनी पोलीस पाटलांचे गावपातळीवरील पर्यावरण विकास समित्यांशी एकीकरण करण्याची गरज आणि जनजागृतीसाठी त्यांची भूमिका सांगितली.

या कार्यशाळेत वन विभाग आणि स्थानिक कायद्याची अंमलबजावणी यांच्यातील सहकार्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले, जेणेकरून महत्त्वाच्या वनक्षेत्रांचे आणि वन्यजीवाचे नैसर्गिकरीत्या संरक्षण होईल.


धन्यवाद


धन्यवाद



## पोस्टे उमरेड हद्दीत अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर कायदेशिर कार्यवाही

दि. ०३/०९/२०२४ रोजी चे ०९.०० वा. ते ०९.५० वा. दरम्यान मौजा मसाळा येथे गावठी दारू गाळणाऱ्या इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारी महिला आरोपी ही मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिंग भट्टी काढताना मिळुन आली. आरोपींचे ताब्यातून एकुण मोहाफुल रसायण सडवा ३०० लिटर किंमती १५०००/—रु व मोहाफुल गावठी दारु ४८ लिटर किंमती २४००/—रु व दारु गाळण्याचे साहीत्य प्लास्टीक ड्रम, जळाऊ लाकुड, रबर पाईप, जर्मन घमिले, स्टील झाकणी किंमती ३२५०/—रू. असा एकुण किंमती २०६५०/—रु. चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. महिला आरोपी विरुद्ध पो.स्टे उमरेड येथे कलम ६५ (एफ), (सी), (ब) (ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे उमरेड येथील ठाणेदार पोनि अनिल राउत, पोहवा प्रदीप चवरे, मंगेश फेदजवार यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर